पुणे विद्यापीठ
गणेशखिंड,पुणे-७.

संदर्भ : परीक्षा/बी.ए./बी.कॉम./३५४ दि. ८.११.२०११

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्न कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये.

विषय : द्वितीय व तृतीय वर्ष बी.ए,.बी.कॉम. च्या नियमित [फ्रेश] विद्यार्थ्यांचे (ऑक्टोबर २०११ च्या परीक्षेस न बसलेले ) मार्च/एप्रिल २०१२ च्या परीक्षांसाठी परीक्षा अर्ज १५ डिसेंबर २०११ पर्यंत स्वीकारणेबाबत...

महोदय/महोदया,

मार्च/एप्रिल २०१२ मध्ये होणा-या विविध परीक्षांचे परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखांसंबंधीचे परिपत्रक क्रमांक २०७/२०११ विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेले आहे. ते आपणांस प्राप्त झाले असलेच. परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखांसदर्भात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणांस कळविण्यात येते की, द्वितीय व तृतीय वर्ष बी.ए./बी.कॉम. च्या शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील नियमित [फ्रेश] विद्यार्थ्यांचे [ऑक्टोबर २०११ च्या परीक्षेस न बसलेल्या विद्यार्थ्यांचे] परीक्षा अर्ज विनाविलंब शुल्क आकारुन खाली नमूद केल्याप्रमाणे भरुन घेऊन विद्यापीठात जमा करण्यात यावेत.

| परीक्षेचे नाव | विनाविलंबशुल्क परीक्षा अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|
| द्वितीय व तृतीय वर्ष बी.ए./बी.कॉम. फक्त. | १५ डिसेंबर २०११ |

वरीलप्रमाणे १५ डिसेंबर २०११ पर्यंत परीक्षा अर्ज स्वीकारुन ते विद्यापीठात २० डिसेंबर २०११ पर्यंत नेहमीप्रमाणे जमा करावेत. या मुदतीपर्यंत म्हणजेच १५ डिसेंबर २०११ पर्यंत जे नियमित [फ्रेश] विद्यार्थी परीक्षा अर्ज भरु शकणार नाहीत, त्यांना मार्च/एप्रिल २०१२ च्या परीक्षा कार्यक्रमपत्रिका परिपत्रक क्रमांक २०७/२०११ मध्ये नमूद केलेल्या विनाविलंब शुल्क व विलंबशुल्कासह अंतिम तारखेपर्यंत परीक्षा अर्ज भरता येतील.

आपणांस विनंती की, वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी आणि पत्रातील मजकूर सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावा.

कळावे,

आपला विश्वासू,

परीक्षा नियंत्रक.

प्रत माहितीसाठी:
१. मा. वित्त व लेखा अधिकारी.
२. मा. पध्दती विश्लेषक.

A१/ba.marathi/१